माहितीचा अधिकार

**महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये**
**प्राप्त झालेले व्दितीय अपील**

**अपील क्रमांक : १८३/२०२२**

**अपिलार्थी, श्री. मदन परशरामजी शेळके**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस आयुक्त,**
सिताबर्डी विभाग, नागपूर शहर

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा पोलीस उपआयुक्त,**
परिमंडळ क्र.२, सिताबर्डी, नागपूर शहर

**व्दितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : २८.०२.२०२४**

**अपीलकर्ता : उपस्थित**
**जन माहिती अधिकारी : उपस्थित**
**प्रथम अपीलीय अधिकारी : उपस्थित**

| मूळ अर्जाचा दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपीलाचा दिनांक | प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्याच्या निर्णयाचा/आदेशाचा दिनांक |
|---|---|---|---|
| ०५.१०.२०२१ | ३०.१०.२०२१ | २२.११.२०२१ | २३.१२.२०२१ |

अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ६(१) नुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे **दिनांक ०५.१०.२०२१** रोजी माहितीचा अर्ज सादर केला असून त्यात त्यांनी " न्यायालयीन कामकाजाकरीता पोलीस स्टेशन धंतोली नागपूर अंतर्गत येणाऱ्या न्यूरॉन हॉस्पीटल, बलराज मार्ग, धंतोली बगीचा समोर धंतोली, नागपूर यांनी रुग्णाच्या मृत्यूनंतर पोलीसांना द्यावयाच्या माहितीचे (M.LC Information on dead) पत्राच्या एम.एल.सी. क्रमांकासह वरील दि. ०१.११.२०१९ ते दि. ३१.१२.२०१९ या कालावधीतील सर्व पत्रे धंतोली पोलीस स्टेशनला पाठविले आहे ती सर्व प्रमाणित करुन पुरविण्यात यावी" इ. माहिती मागितलेली आहे. सदर माहिती अर्जावर जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस आयुक्त, सिताबर्डी विभाग, नागपूर शहर यांनी दिनांक ३०.१०.२०२१ रोजीच्या पत्रान्वये, आपण मागणी केल्याप्रमाणे दिलेला कालावधी हा वेगवेगळया रुग्णाबाबत आहे. M.LC मध्ये रुग्णाची वैयक्तिक माहिती व आजार दिलेला असल्याने माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम ८(ञ) प्रमाणे माहिती देता येत नाही. करीता आपली माहिती नाकारण्यात येत आहे, असे अपिलार्थीस कळविले आहे.

तद्नंतर अपिलार्थी यांनी **दिनांक २२.११.२०२१ रोजी** कलम १९ (१) नुसार प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे "माहिती नाकारली आहे " असे कारण नमूद करुन प्रथम अपील दाखल केले. त्यावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १७.१२.२०२१ रोजी सुनावणी घेवून दिनांक २३.१२.२०२१ अन्वये, अपिलार्थी यांनी

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये दिलेल्या अर्जाअनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना पुरविण्यात आलेली माहिती संयुक्तिक व योग्य आहे, असे नमूद करुन अपील निकाली काढले आहे.

त्यानंतर अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) नुसार आयोगाकडे **दिनांक २०.०१.२०२२ रोजी** " अपेक्षित असलेली माहिती पुरविली नाही. चुकीची माहिती दिली " असे कारण नमुद करून द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपील अर्ज आयोग कार्यालयास दिनांक २१.०१.२०२२ रोजी प्राप्त झाला आहे. त्यावर दिनांक २६.०२.२०२४ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती परंतु काही कारणास्तव सदर सुनावणीची कार्यवाही पुर्ण होऊ शकलेली नाही. त्यानंतर सदर प्रकरणात आज दिनांक २८.०२.२०२४ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आलेली असून सुनावणी दरम्यान अपिलार्थी उपस्थित आहेत. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त, श्री. सुधीर नंदनवार उपस्थित आहेत. तसेच विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी यांचेतर्फे श्री. वैभव भगत, पोलीस उप निरीक्षक, पोलीस स्टेशन धंतोली, नागपूर शहर उपस्थित आहेत.

सदर प्रकरणातील उपलब्ध कागदपत्रे व सुनावणी दरम्यान उत्तरवादी यांनी केलेल्या युक्तीवादावरुन असे निदर्शनास आले की, अपिलार्थी यांनी दाखल केलेल्या व्दितीय अपील अर्जासोबत त्यांनी त्यांचा सविस्तर लेखी युक्तीवाद सादर केला आहे. यात त्यांनी अपेक्षित असलेली माहिती पुरविली नाही व चुकीची माहिती दिलेली असल्याचे नमूद केले आहे. यात माहिती अधिकार कायद्याची पायमल्ली झाली असून अर्जाशी संबंधित जबाबदार सर्व अधिकाऱ्यावर नियमानुसार प्रशासकीय कार्यवाही करण्यात यावी, तशी शासनाकडे शिफारस करण्यात यावी. तसेच झालेल्या आर्थिक, मानसिक, शारिरीक, नैतीक नुकसान भरपाई पोटी ५,००,०००/- (पाच लाख रुपये) नुकसान भरपाई मिळण्याची आग्रही विनंती केली आहे. सदर प्रकरणी प्राधिकरणाच्या वतीने दाखल केलेल्या लेखी खुलाश्यात जन माहिती अधिकारी यांनी माहितीचा अधिकार अधिनियमातील कलम ८(१)(ञ) चा दाखला देत अपिलार्थीस माहिती देण्याचे नाकारले आहे. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या आदेशाचे अवलोकन केले असता, जन माहिती अधिकारी यांनी दिलेला प्रतिसाद संयुक्तिक व योग्य असल्याचा निष्कर्ष काढून अपील निकाली काढले आहे. सदर प्रकरणामध्ये माहिती अधिकार कायद्यातील विहीत तरतुदीनुसार व्यक्तीच्या खाजगी पणाच्या हक्काची जोपासना केलेली असल्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी दिलेला प्रतिसाद व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी पारीत केलेला आदेश माहितीचा अधिकार कायद्याशी संयुक्तिक आढळून येतो. त्यामुळे प्रस्तूत व्दितीय अपील अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

(राहुल भा.पांडे)
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ नागपूर

राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर ★नागपूर★ सत्यमेव जयते

**ठिकाण : नागपूर**
**दिनांक : २८.०२.२०२४**
जावक क्रमांक 3891 दिनांक 2 JUL 2024